पुढारी E-PAPER

Sunday, September 04, 2005 1:40:00 AM

# जेजुरीत पर्यावरण संवर्धन संशोधकवृत्तीसाठी कार्यशाळा

जेजुरी : वार्ताहर

सिटी ऑफ द बर्डस कॉन्झर्व्हेशन अॅन्ड रिसर्च आणि विश्‍वनिर्मल विद्यामंदिर, जेजुरी यांच्या वतीने ग्रामीण भागातील मुलांमध्ये शास्त्रीय दृष्टिकोन, पर्यावरण संवर्धन व संशोधन वृत्ती निर्माण व्हावी, यासाठी दोन दिवसांची कार्यशाळा यशस्वीरित्या संपन्न झाली असल्याचे आयोजक सनी (चंद्रकांत) रेडिकन यांनी सांगितले.

जेजुरी येथील विश्‍वनिर्मल विद्यालयात पर्यावरणाचे संवर्धन व प्रत्यक्ष कृती संशोधनाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेसाठी लोणी काळभोर, कोथळे, जिजामाता, पुण्यश्लोक व विश्‍निर्मलचे ५० शिबिरार्थी सहभागी झाले होते. इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स एज्युकेशन अॅन्ड रिसर्च, आगरकर रिसर्च इन्स्टिट्यूट, आबासाहेब गरवारे कॉलेज, मॉडर्न कॉलेज पुणे, अहमदनगर व वाय. सी. कॉलेज सातारा येथील १५ तज्ज्ञ मार्गदर्शकांनी विद्यार्थ्यांना निसर्गातील सजीव प्रजातींचे निरीक्षण, संवर्धनाविषयी मार्गदर्शन करून, कडेपठार डोंगर, होळकर तलाव व साकुर्डे परिसरातील पक्षी, प्राणी, किटक आदी सजीव घटकांविषयी प्रत्यक्ष भेट देऊन माहिती दिली. विद्यार्थ्यांमध्ये संशोधनवृत्ती निर्माण व्हावी, यासाठी निरीक्षणातून प्रकल्प ही करून घेतले.

डॉ. अविनाश वंजारे, डॉ. युगंधर शिंदे, तसेच पी. एच. डी.चे विद्यार्थी समीर पाध्ये, श्रुती पत्तेदार, सायली शेठ, निखील मोडक, अबोली कुलकर्णी, सिद्धार्थ कुलकर्णी, सिद्धार्थ बिनीवाले, अनिकेत मराठे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. पर्यावरणाविषयी ग्रामीण विद्यार्थ्यांमध्ये प्रेम निर्माण व्हावे, प्रत्यक्ष निरीक्षणातून मुलांमध्ये संशोधन वृत्ती निर्माण व्हावी, यासाठी हा उपक्रम सतत राबविणार असल्याचे सनी रेडिकन यांनी सांगितले.

प्राचार्य पेट्रिक रेडिकन, प्रज्ञा रेडिकन, रेश्मा पानसरे, अर्चना लोखंडे आदींनी या कार्यशाळेचे नियोजन केले. जैविक विविधता नष्ट होत असून तिचे जतन करण्यासाठी सातत्याने मार्गदर्शन करणार असल्याचे यावेळी डॉ. अविनाश वंजारे, डॉ. युगंधर शिंदे यांनी सांगितले.



पर्यावरण संवर्धन कार्यशाळेत निरीक्षण करताना विद्यार्थी.

कार्यशाळेच्या समारोप प्रसंगी नगराध्यक्ष अविनाश भालेराव, नगरसेविका साधना दिडभाई, सुरेखा सोनवणे, ज्ञानेश्वरी बारभाई यांनी या उपक्रमाचे कौतुक केले.